राज्य आपत्कालीन कार्य केन्द्राचे
नुतनीकरण करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०१८/प्र.क्र.९१/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- २८ मार्च, २०१८.

वाचा :- महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- मंनिक-२०१६/प्र.क्र.८६/मंनिक-१, दि.२.८.२०१६

शासन निर्णय :-

आपत्ती व्यवस्थापन प्रभागांतर्गत असलेल्या राज्य आपत्कालीन कार्य केन्द्राच्या नुतनीकरणाच्या कामापैकी स्थापत्यविषयक कामासाठी होणा-या खर्चासाठी कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांना रु. ५९,६२,४०८/- (रुपये एकोणसाठी लाख बासष्ट हजार चारशे आठ फक्त) एवढा निधी अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

वरील धनादेश Executive Engineer, Presidency Division, Mumbai यांचे नावे काढण्यात यावा.

या कामी होणारा खर्च १३ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या आणि राज्य आपत्ती सौम्यिकरण निधीत वर्ग केलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०३२८१८३८५०१८१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.,

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2018.03.28 18:40:17 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई
२) सह सचिव, मंत्रालय नियंत्रण कक्ष, मंत्रालय, मुंबई
३) संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
४) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
५) अवर सचिव, मंत्रालय नियंत्रण कक्ष, मुंबई
६) लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग,मंत्रालय, मुंबई
७) निवड नस्ती.